**मा.मुख्यमंत्री/उप मुख्यमंत्री/मंत्री /राज्यमंत्री /मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव / सचिव या मंत्रालयीन अधिकारी तसेच मा.मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयीन दालनात दूरचित्रवाणी संचासाठी आवश्यक असलेली केबल सेवा, सेट-टॉप बॉक्स इत्यादी सेवा पुरविण्याकरीता क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, मुंबई या कंपनीला दिनांक १ मे, २०२६ ते ३० एप्रिल, २०२८ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्र. टिईएल-१०२३/प्र.क्र.३१/निवास-१,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १४ मे, २०२६

**वाचा:-** १. शासन निर्णय क्र.टिईएल१०१३/प्र.क्र.२०/२०१३/२२,दिनांक १३ मे, २०१६
२. शासन निर्णय क्र.टिईएल१०१९/प्र.क्र.३८/२२, दिनांक १३ जून, २०१९
३. शासन निर्णय क्र.टिईएल१०२१/प्र.क्र.२६/२२, दिनांक २९ जून, २०२१
४. शासन निर्णय क्र.टिईएल१०२३/प्र.क्र.३१/२२, दिनांक ११ मे, २०२३

**प्रस्तावना:**

मा.मुख्यमंत्री/उप मुख्यमंत्री/मंत्री/राज्यमंत्री/मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव या मंत्रालयीन अधिकारी तसेच मा.मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयीन दालनातील दूरचित्रवाणी संचासाठी आवश्यक असलेली केबल सेवा, सेट-टॉप बॉक्स इत्यादी सेवा पुरविण्याकरीता दरामध्ये सुसूत्रता राहण्यासाठी व मंत्रालयीन सुरक्षिततेच्या दृष्टीने दिनांक ११ मे,२०२३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १ मे, २०२३ ते दि. ३० एप्रिल,२०२६ या कालावधीकरीता त्रैवार्षिक करार करण्यात आला. सदर कराराची मुदत दि.३० एप्रिल,२०२६ रोजी संपुष्टात आली असल्यामुळे मे. क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, मुंबई यांना दिनांक १ मे, २०२६ ते ३० एप्रिल, २०२८ या दोन वर्षाच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

**शासन निर्णय:-**

मा.मुख्यमंत्री/ उप मुख्यमंत्री/राज्यमंत्री/मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव या मंत्रालयीन अधिकारी तसेच मा.मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयीन दालनातील दूरचित्रवाणी संचासाठी आवश्यक असलेली केबल सेवा, सेट-टॉप बॉक्स इत्यादी सेवा पुरविण्याकरीता शासन निर्णय क्र. टिईएल १०२३/प्र.क्र.३१/२२, दिनांक ११ मे, २०२३ अन्वये दिनांक १ मे, २०२३ ते दिनांक ३० एप्रिल, २०२६ या त्रैवार्षिक कालावधीकरीता मे.क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, मुंबई या कंपनी सोबतचा सेवा दरकरार दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी संपुष्टात आला आहे.

मे. क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, मुंबई यांचेकडून यापूर्वी देण्यात आलेल्या सेवा समाधानकारक आहेत तसेच कंपनीने सध्याच्या वाढत्या महागाईच्या काळातही सन २०२३ मध्ये नमूद केलेल्या दरांमध्ये कोणतीही दर वाढ न करता सेवा देण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे आर्थिक दृष्टयाही किफायतशीर ठरत असल्याने त्यांना नवीन सेट-टॉप बॉक्स दर प्रती नग रु. ४३००/- व मासिक शुल्क प्रती नग रू. ६२५/- इतक्या पुर्वीच्याच दराने खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून दिनांक १ मे, २०२६ ते ३० एप्रिल, २०२८ या दोन वर्षाच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

१) मा.मुख्यमंत्री/उप मुख्यमंत्री/मंत्री/राज्यमंत्री/मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्या कार्यालयातील दूरचित्रवाणी संचाकरीता लागणारे केबल सेवा, सेट-टॉप बॉक्स इत्यादींचा दर्जा उच्च प्रतीचा असावा.

२) दूरचित्रवाणी संचाकरीता लागणारे केबल साहित्य व केबल सुविधा माफक दरात पुरवावी.

३) दूरचित्रवाणी संचाकरीता लागणारे केबल साहित्य व केबल सुविधेचे दरपत्रक स्विकारल्यानंतर कोणत्याही परिस्थतीत दर वाढवून दिले जाणार नाहीत.

४) दूरचित्रवाणी संचाकरीता लागणारे केबल साहित्य व केबल सुविधेसाठी जे दर ठरविण्यात आले आहेत, ते दर तसेच अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

५) करार कालावधीत सेवा असमाधानकारक आढळल्यास करार रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

६) रु. ५०,०००/- एवढ्या रक्कमेची बँक गॅरेंटी शासनास सादर करावी.

७) भविष्यात आवश्यकतेनुसार काही अटी व शर्ती समाविष्ट करावयाच्या झाल्यास तसे करण्याचा हक्क शासनास राहतील.

८) पुर्वीच्याच दराने दूरचित्रवाणी संचाकरिता लागणारे केबल साहित्य व सुविधा पुरविणे बंधनकारक राहील.

९) शासनाशी केलेला करार मध्येच खंडीत करता येणार नाही.

१०) दूरचित्रवाणी संचाकरिता लागणारे केबल साहित्य व केबल सुविधा पुरविण्याचे कंत्राट दिल्यानंतर याबाबतची देयके संबंधित प्रशासकीय विभागाच्या उप सचिवांनी प्रमाणित केल्यानंतर त्या विभागाकडून अदा करण्यात येतील.

११) पाचशे रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर शासनासमवेत करारनामा करावा.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०५१४१४५७४९४००७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEVIDAS SANDUJI BHAGURE

Digitally signed by DEVIDAS SANDUJI BHAGURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=0990AE5E49835C85A735703503A82E3CD3CDDE019C8CE2FDB9C7765EF1B7C39F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D19FEFD30011466572B4E69158C3099ADDED4CBB59D6833F72ED93F73A564DC, cn=DEVIDAS SANDUJI BHAGURE
Date: 2026.05.14 14:59:38 +05'30'

**( दे. सां. भगुरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा/परिषद व संसद सदस्य.
३. मा.राज्यपालांचे सचिव.

४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
८. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
९. मुख्य मंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. अवर सचिव (का.विनियम), वित्त विभाग मंत्रालय, मुंबई-३२
१४. सर्व मंत्रालयीन विभाग.
१५. शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय आवार, मंत्रालय, मुंबई - ३२
१६. शाखा अभियंता (सा.बां.) बंगलो, नवीन प्रशासकीय भवन, तळमजला, मुंबई - ३२
१७. कार्यासन अधिकारी, का.२१-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१८. मे. क्लासिक एंटरटेनमेंट नेटवर्क, ७, पंकज को.ऑ.हौ.सो.लि., नेहरु रोड, वाकोला, सांताक्रुझ (पू.), मुंबई-५५.
१९. निवडनस्ती.